महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे  Rs.2/-  कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ २६ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३२७ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पत्रकार हवे आहेत**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'

मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)

संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com


# मान्सून महाराष्ट्रात दाखल

## ७२ तासांत राज्यभरात सक्रिय होण्याची शक्यता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मोसमी पाऊस रविवारी (२५ मे) राज्यात दाखल झाला असून, देवगड मध्ये तसेच कर्नाटक, संपूर्ण गोव्यात मोसमी पावसाचे आगमन झाले आहे. राज्यात सोमवारपासून पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तविण्यात आला आहे. गेल्या सोळा वर्षांतील नोंदीनुसार राज्यात पाऊस लवकर दाखल झाला आहे. प्रादेशिक हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मोसमी वारे रविवारी तळकोकणात दाखल झाले आहेत. तसेच कर्नाटक, संपूर्ण गोवा मोसमी वाऱ्यांनी व्यापला आहे. मोसमी पावसाच्या वाटचालीसाठी पोषक स्थिती असून, पुढील तीन दिवसांत पाऊस मुंबईसह विदर्भ, उत्तर महाराष्ट्रापर्यंत धडक देण्याचा अंदाज आहे. यंदा केरळमध्ये वेळेआधीच मोसमी पाऊस दाखल झाला आहे. अंदाजित वेळेपेक्षा ८ दिवस अगोदर आणि मागील १६ वर्षांच्या तुलनेत मोसमी वारे लवकर दाखल झाले. दरम्यान, मध्य अरबी समुद्राच्या काही भागात, उर्वरित महाराष्ट्रात, कर्नाटक, आंध्रप्रदेशच्या काही भागात आणि तामिळनाडूच्या उर्वरित भागात पुढील ३ दिवसांत मोसमी वारे दाखल होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

महाराष्ट्रात तळकोकणासह कर्नाटक, संपूर्ण गोव्यात मोसमी पावसाचं आगमन झालं आहे. मुंबई-ठाण्यासह राज्यात सोमवारपासून पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तविण्यात आला आहे. गेल्या दशकभरातील नोंदींनुसार राज्यात यंदा पाऊस सर्वात लवकर दाखल झाला आहे. रविवारी मुंबई आणि ठाण्याला यलो अलर्ट दिला होता. हवामान विभागाची माहिती : प्रादेशिक हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, मोसमी वारे रविवारीत तळकोकणात दाखल झाले आहेत. या मोसमी वाऱ्यांनी सध्या कर्नाटक आणि संपूर्ण गोवा व्यापला आहे. मोसमी पावसाच्या सक्रिय वाटचालीसाठी सध्या कमालीची पोषक स्थिती आहे. पुढील तीन दिवसांत पाऊस मुंबई-ठाण्यासह, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भापर्यंत धडक





देण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मान्सून यंदा केरळमध्ये वेळेआधीच दाखल झाला आहे. गेल्या दशभराच्या तुलनेत मोसमी वारे 8 दिवस लवकर दाखल झाले आहेत.

### तळकोकणात पावसाची जोरदार हजेरी

अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यानं मोसमी पावसासाठी अधिक पोषक वातावरण निर्माण केलय. राज्यात मोसमी वारे दाखल होत असतानाच कर्नाटक, आणि संपूर्ण गोव्यासह सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोसमी वाऱ्यांनी जोरदार मुसंडी मारली आहे. अरबी समुद्राच्या काही भागात, उर्वरित महाराष्ट्रासह आंध्र प्रदेशच्या काही भागात आणि तामिळनाडूच्या उर्वरित भागात पुढील 3 दिवसात मोसमी वारे दाखल होणार असल्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. मान्सूनची एकूण आगेकूच पाहता पुढील काही तासांमध्ये मान्सून मुंबई आणि पुण्यात दाखल होईल, असा अंदाज आहे. आज सकाळपासून मुंबई, उपनगर आणि ठाण्यात ढगाळ वातावरण आहे.

### गोव्यासह कोकण किनारपट्टीला ऑरेंज अलर्ट

गोव्यात सध्या मुसळधार पाऊस कोसळत आहे. अनेक सखल भागात पाणी साचण्याच्या घटना घडल्या आहेत. काही ठिकाणी गोव्यातील रस्त्यांना नदीचं स्वरूप आलं आहे. म्हापसा बाजरपेठेत पावसाचे पाणी साचलं आहे. गोव्यात पडणाऱ्या मुसळधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं असून पुढच्या काही तासांसाठी गोव्याला ऑरेंज अलर्ट आहे. अशीच काहीशी परिस्थिती सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी आणि रायगडमध्ये आहे. तिन्ही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट आहे. वादळी वाऱ्यामुळं तळकोकणात अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्याचं पाहायला मिळलं. तसंच पावसाच्या वेगाचा अनेक ठिकाणी शेतीपिकावरही परिणाम झाल्याचं पाहायला मिळतंय.

थोडक्यात महत्वाचे

## खोणी शिरढोणमधील म्हाडाची घरे सर्वात स्वस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे (म्हाडाचा विभागीय घटक) सन २०२४ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटातील सदनिकांसाठी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर काढण्यात आलेल्या सोडतीतील मौजे शिरढोण (ता. कल्याण, जि. ठाणे) व मौजे खोणी (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील ०६ हजार २४८ सदनिकांची विक्री किंमत कमी करण्यात आली आहे. पात्र लाभार्थ्यांना या निर्णयामुळे आर्थिक दिलासा मिळणार असल्याची माहिती कोकण मंडळाच्या मुख्य अधिकारी रेवती गायकर यांनी दिली. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी मौजे शिरढोण येथील सदनिकांच्या सुधारित विक्री किंमत प्रस्तावास मान्यता दिली असून सदर मान्यतेनुसार कोकण मंडळाच्या ऑक्टोबर २०२४ मधील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेतील ठाणे जिल्ह्यातील मौजे शिरढोण येथील अत्यल्प उत्पन्न गटातील ५२३६ सदनिकांची विक्री किंमत प्रती सदनिका ०१ लाख ४३ हजार ४०४ रुपयांनी कमी करण्यात आली असून सदर सदनिकेची सुधारित विक्री किंमत आता १९ लाख २८ हजार ७४२ रुपये आकरण्यात येणार आहे, असे गायकर यांनी सांगितले. तसेच मंडळाच्या ऑक्टोबर २०२४ मधील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावरील मौजे खोणी (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील अत्यल्प उत्पन्न गटातील १०१२ सदनिकांची विक्री किंमत प्रती सदनिका ०१ लाख ०१ हजार ८०० रुपयांनी कमी करण्यात आली असून सदर सदनिकेची सुधारित विक्री किंमत आता १९ लाख ११ हजार ७०० रुपये असणार आहे.

## विजेच्या धक्क्याने तरुण जखमी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगर कॅम्प तीन परिसरातील काजल पेट्रोल पंपाजवळील कृष्णा ट्रान्सपोर्ट येथे पावसाळा पूर्व तयारी अंतर्गत प्लास्टिक पन्नी टाकण्याचे काम सुरू होते. यावेळी विजेचा झटका लागून तरुण गंभीर जखमी झाला. संतोष आढाव असे तरुणाचे नाव आहे. ही घटना आज (दि.२४) दुपारी एकच्या सुमारास घडली. संतोष आढाव हा तरुण पत्र्यावर काम करत असताना त्याचा संपर्क पत्र्यावरून गेलेल्या विजेच्या उच्च दाबाच्या वाहिनीशी झाला. त्यामुळे त्याला जोरदार विजेचा धक्का बसला आणि तो जागीच भाजून निघाला. अपघात घडताच घटनास्थळी उपस्थित स्थानिक नागरिकांनी तत्काळ संतोषला पत्र्यावरून खाली उतरवून नजीकच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्याची प्रकृती गंभीर असल्यामुळे प्राथमिक उपचारानंतर त्याला तातडीने मुंबईतील रुग्णालयात हलविण्यात आले. संबंधित पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे.

## उल्हासनगरची कचराकोंडी

### एकमेव कचराभूमीला स्थानिकांचा विरोध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगरः दररोज सुमारे ३५० टन कचरा निर्माण करणाऱ्या उल्हासनगर शहराच्या एकमेव गायकवाड पाडा भागातील कचराभूमीवर कचरा टाकू देण्यास स्थानिकांना विरोध केला आहे. त्यामुळे गेल्या पाच दिवसांपासून गायकवाड पाडा येथील कचराभूमीवर कचरा टाकला जात नसून परिणामी शहरातील घंटागाड्यांनी शहरातील कचरा उचलणे बंद केले आहे. त्यामुळे शहरात कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. एकीकडे पाऊस सुरू असताना झालेली ही कचराकोंडी आरोग्याचा प्रश्न निर्माण करू शकते अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

सुमारे साडे पाच लाख लोकसंख्या असलेल्या उल्हासनगर शहरात कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर झाला आहे. गेल्या काही वर्षात उल्हासनगर शहराला स्वतःची हक्काची अशी कचराभूमी मिळू शकलेली नाही. त्यामुळे खेमानी भागातील कचराभूमीची क्षमता संपल्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात कॅम्प पाच भागातील गायकवाडपाडा येथील खदान परिसरात उल्हासनगर पालिकेने कचरा टाकण्यास सुरूवात केली होती. त्यावेळी स्थानिकांनी याला विरोधही केला होता. मात्र तात्पुरती सोय असल्याचे सांगत पालिका प्रशासनाने वेळ मारून नेली होती.

## पाच दिवसांत पूर्ण होणार मीरा-भाईंदरची नालेसफाई?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** पाऊस अति पडला तरी किंवा अजिबात पडला नाही तरी नुकसान करतो. त्यामुळे पावसाळा म्हटला की सामान्य नागरिकांच्या पोटात गोळाच येतो. आधीच्या वर्षाच्या अनुभवावरून शाहणे होऊन पुढील वर्षीचा त्रास टाळण्यासाठी महापालिका प्रशासनाचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू असतात. त्यातील महत्त्वाचे काम असते नालेसफाईचे. पावसाळ्यात शहरात पाणी साचू नये



यासाठी नालेसफाई योग्य पद्धतीने व वेळेत पूर्ण होण्यासाठी महापालिका प्रशासनाने एप्रिलपासून सुरू केलेले काम जवळजवळ ६५ टक्के पूर्ण झाले असून ३१ मे पूर्वी ते पूर्ण करण्याचा निर्धार केला आहे.

**पालिकेने शहरातील १५५ नाले सफाईसाठी ४ कोटी रुपयांची तरतूद केली असून शहरातील ४५ सखल भागांसाठी सक्शन पंप तैनात केले आहेत. मीरा-भाईंदर शहरात लहान मोठे १५५ नाले आहेत. त्यात मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील दिल्ली दरबार हॉटेल जवळ, वेस्टर्न पार्क, पंजाब फौंड्री, मुंशी कंपाऊंड, लक्ष्मी पार्क यांचा प्रामुख्याने समावेश आहे. महापालिकेने २० एप्रिलपासून नालेसफाईस सुरुवात केली होती.**

## बदलापुरात वायू गळती !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूरः** पूर्व मोसमी पाऊस लवकर आल्याने मे महिन्यात दिवसभर पावसाचे वातावरण असते. वातावरणात बदल झालेला असतानाच शनिवारी रात्री बदलापूर शहरात रात्री पूर्वेतील बहुतांश भागात उग्र दर्प पसरला होता. त्यामुळे अनेकांना श्वसनाचा त्रास जाणवला. बदलापूर पूर्वेत औद्योगिक वसाहत असून त्यातून अनेकदा रासायनिक वायू सोडला जातो. त्यामुळे अनेकदा शहरात धुर पसरल्याचे चित्र असते. शनिवारीही असाच प्रकार झाल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत होता.

बदलापूर शहरात पर्यावरणाची दिवसेंदिवस हाणी होत असल्याचे चित्र आहे. बदलापूर शहरात पूर्वेतील खरवई भागात मोठी औद्योगिक वसाहत आहे. या वसाहतीतून निघणारे रासायनिक सांडपाणी वाहून अंबरनाथपर्यंत वाहिनीच्या माध्यमातून नेले जाते. अनेकदा ही सांडपाणी वाहिनी बदलापूर पूर्वेतून जाणाऱ्या बदलापूर कर्जत

**रात्री आठच्या सुमारास बदलापुरच्या खरवई भागात रासायनिक धुर पसरल्याचे जाणवत होते. घोरपडे चौकापर्यंत या धुराचा त्रास जाणवत होता. उग्र दर्प पसरल्याने नागरिकांना दारे खिडक्या बंद करुन ठेवण्याची वेळ आली होती.**

राज्यमार्गावर फुटते. त्याचे सांडपाणी नाल्यावाटे थेट उल्हास नदीत जाऊन मिसळते. इतर अनेक मार्गांनाही रासायनिक सांडपाणी उल्हास नदी मिसळते आहे. त्यामुळे उल्हास नदीतील प्रदुषण वाढते आहे. त्यातच गेल्या काही वर्षात सातत्याने याच औद्योगिक वसाहतीतून रासायनिक वायू सोडण्याचे प्रमाणही वाढले आहे.

वायू गळती होत असल्याने बदलापुरकरांना रासायनिक उग्र दर्पाचा सामना करावा लागतो. अनेकदा नागरिकांना श्वास घेण्यात अडचणी येतात. डोळे चुरचुरणे, तीव्र वास जाणवल्याने नागरिक संताप व्यक्त करतात. बदलापूर पूर्वेतील बहुतांश भाग आणि पश्चिमेतील बॅरेज रस्ता आणि रमेशवाडी भागातही याचा त्रास जाणवतो. शनिवारी रात्री आठच्या सुमारास अशा प्रकारे पुन्हा एकदा रासायनिक वायू गळती झाल्याचा अनुभव बदलापुरकरांना आला. रात्री आठच्या सुमारास बदलापुरच्या खरवई भागात रासायनिक धुर पसरल्याचे जाणवत होते. थेट बदलापूर पूर्वेतील घोरपडे चौकापर्यंत या धुराचा त्रास जाणवत होता. उग्र दर्प पसरल्याने नागरिकांना दारे खिडक्या बंद करून ठेवण्याची वेळ आली होती.

रात्री साडेआठच्या सुमारास बदलापूर पूर्वेतील औद्योगिक वसाहतीच्या परिसरात हवेचा गुणवत्ता

**खासगी कोकण हवामान अभ्यासक अभीजीत मोडक यांनी दिली आहे. यापूर्वीही अनेकदा बदलापुरातील हवेचा निर्देशांक २०० पार गेल्याचे दिसून आले होते. तर काही महिन्यांपूर्वी नायट्रोजनची गळतीही बदलापुरकारांनी सहन केली होती. त्यामुळे औद्योगिक वसाहतीतून सोडले जाणाऱ्या या रासायनिक वायूवर नियंत्रण ठेवून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होते आहे.**

## पाऊस सुरु नालेसफाईचा बोजवारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. २५ (वार्ताहर) :** मागील १५ दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावलेली आहे. त्यातच भिवंडी पालिका क्षेत्रातील नालेसफाईची कामे उशिरा सुरू झाली. आता मॉन्सून महाराष्ट्राच्या वेशीवर आला असताना केवळ ५० टक्केच नालेसफाई झाली आहे. त्यामुळे येत्या पावसाळयात शहरातील असंख्य सखल भागात पाणी साचण्याची भीती नागरिकांकडून वर्तविली जात आहे. पालिका आयुक्त अनमोल सागर यांनी सुरुवातीलाच नालेसफाईची कामे गांभीर्याने करण्याचे आदेश दिले होते; मात्र पालिका प्रशासनातील काही अधिकारी याकडे गांभीर्याने पाहत नसल्याचे म्हटले जात आहे.

पावसाळापूर्व शहरातील नालेसफाई करण्याचा प्रघात आहे, जेणेकरून शहरातील सखल भागासह रस्त्यांवर पाणी साचू नये, यासाठी विशेष खर्च करून नालेसफाई केली जाते. यावर्षी पालिका क्षेत्रातील पाच प्रभाग समितीअंतर्गत ४४ हजार ५६५ मीटर लांबीचे १३५ नाले व मोठी गटारे यांच्या पावसाळापूर्व सफाईसाठी दोन कोटी २७ लाख ९७हजार १३६ रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे.









## वाचक मनोगत

# 'पाक'प्रेमींवर कारवाई गरजेची !




विविध प्रकारच्या मिठाई ही राजस्थानची एक वेगळी ओळख आहे. असे म्हणतात मिठाई खाण्यात राजस्थानी मंडळींचा हात कुणीच धरू शकत नाही. राजस्थानची राजधानी असलेल्या जयपूर शहरात तर नाक्यानाक्यावर मिठाईची दुकाने पाहायला मिळतात.

पहलगाम हल्ल्यानंतर येथील मिठाईवाल्यांनी एक अनोखा निर्णय घेतल्याने जयपूरची चर्चा आज संपूर्ण देशभरात केली जात आहे. येथील सर्व प्रसिद्ध मिठाईना 'पाक' हा शब्द जोडला जातो. 'गोंडपाक', 'म्हैसूरपाक', 'मावापाक', 'अंजीरपाक', 'काजूपाक', 'देसीपाक' अशी या मिठाईंची नावे आहेत. यापुढे या मिठायांना 'पाक' ऐवजी 'श्री' हा शब्द जोडला जाणार आहे. त्यामुळे 'गोंडपाक'चे नाव पालटून 'गोंडश्री' करण्यात आले आहे. 'म्हैसूरपाक'चे नाव पालटून 'म्हैसूरश्री' करण्यात आले आहे. पाक या शब्दाप्रती द्वेष निर्माण झाल्याने समस्त मिठाईवाल्यांनी हा निर्णय घेतला आहे.

पाकिस्तानच्या निर्मितीच्याही आधी 'पाक' हा शब्द आपल्याकडे प्रचलित असला तरी पाकिस्तानप्रती द्वेष प्रकट करण्यासाठी जयपूरकरांनी घेतलेल्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. आजची देशाची स्थिती पाहता केवळ पदार्थाच्या नावातून 'पाक' शब्द हटवणे पुरेसे नसून भारतात राहून भारताचे खाऊन भारताशी वैरभावनेने वागणाऱ्या 'पाक'प्रेमींना देशातून हटवण्याची आवश्यकता आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर समस्त भारतवासीयांनी पाकिस्तानप्रतीचा आपला द्वेष विविध माध्यमांद्वारे प्रकट केला. काही ठिकाणी पाकिस्तानचे राष्ट्रध्वज रस्त्यावर तर काही ठिकाणी पादचारी पुलांच्या पायऱ्यांवर चिकटवण्यात आले होते, तेव्हा तेथील पाकप्रेमींचे पाकप्रेम उफाळून आले आणि त्यांनी ते ध्वज काढण्याचा प्रयत्न केला तर काही ठिकाणी यावरून दंगली घडवण्याचाही प्रयत्न करण्यात आला. देशात वास्तव्य करणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांचा शोध घेत असताना देशातील लाखो महिलांनी पाकिस्तानी पुरुषांशी विवाह करून त्या आणि त्यांची मुले भारतातच राहत असल्याचे उघड झाले.

या मंडळींकडे भारतीय नागरिकत्वाची सर्व कागदपत्रे होती. येथील सोयी सुविधांचा बिनदिक्कतपणे ही मंडळी लाभ घेत होती.

याच दरम्यान पाकिस्तानच्या समर्थनार्थ सोशल मीडियातून पोस्ट करणारी काही मंडळीही उजेडात आली. खेळांच्या सामन्यात भारताचा पराभव झाल्यावर आणि पाकिस्तानचा विजय झाल्यावर फटाके फोडून आनंद व्यक्त करणारी पाकप्रेमी मंडळीही देशात बऱ्याच ठिकाणी आढळून येतात.

ज्या ज्या वेळी भारतात आतंकवादी हल्ले होतात तेव्हा त्यांना साहाय्य करणारी देशद्रोही मंडळी भारतातील वस्त्यांतूनच पकडली जातात. आतंकवाद्याच्या जनाज्याला लाखोंची गर्दी करणारी, आतंकवाद्यांचे वकीलपत्र घेणारी, पाकिस्तानातून अवैधपणे भारतात येणाऱ्या घुसखोरांना आश्रय देणारी, त्यांच्या निवासाची आणि रोजीरोटीची सोय करणारी मंडळीही येथेच राहत आहेत. अशा 'पाक'प्रेमी मंडळींना शोधून त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करणे आज निकडीचे असून त्यासाठी समस्त राष्ट्रप्रेमी नागरिकांनी संघटित होणे आवश्यक आहे.

**मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

# कल्याण इमारत दुर्घटनेत कुटुंबीय गमावलेल्या माणसाची कहाणी..

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**"माझं तर घरच तुटलं आहे. मुलांना घेऊन आता कुठे जाऊ? आता आमचं कोणीही उरलेलं नाही. माझ्या घरातील लक्ष्मी गेली. आसरा गेला," नीलांचल साहू आक्रंदत बोलत होते. आपल्या कुटुंबातील तीन व्यक्ती गमावलेल्या नीलांचल यांना आपलं दुःखं आवरता आवरत नव्हतं.**

कल्याण शहरातील कल्याण (पूर्व) चिकणीपाडा येथील सप्तशृंगी कॉपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी या चार मजली निवासी इमारतीमधील चौथ्या मजल्यावर फरशी बसविण्याचे काम सुरू होतं. तेव्हाच चौथ्या मजल्याचा स्लॅब खाली कोसळला आणि ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत एकूण 6 व्यक्ती जखमी झाल्या असून 6 व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

या दुर्घटनेत 41 वर्षीय नीलांचल साहू यांच्या कुटुंबातील तीन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये त्यांच्या पत्नी 38 वर्षीय सुनीता साहू, 56 वर्षीय सासू प्रमिला साहू आणि 32 वर्षीय मेहुणी सुजाता पाडी यांचा समावेश आहे. सासू आणि मेहुणी त्यांच्याकडे दोन दिवस पाहुण्या म्हणून रहायला आल्या होत्या.




या घटनेत साहू यांची 14 वर्षांची मुलगी सुदैवाने वाचली. त्यांचा 17 वर्षांचा मुलगा ट्यूशनला गेला होता. त्यामुळे, तोही वाचला. पण, या घटनेचा त्यांच्या मुलांवर खोल परिणाम झाला आहे. ते दोघे अजूनही धक्क्यातून सावरलेले नाहीत, असं साहू कुटुंबीयांनी सांगितलं.

**"पत्नी , सासू आणि मेहुणी गेली. आता कोणाच्या आधाराने आम्ही जगायचं? माझ्या मुलांचं काय होईल? आता असं वाटतंय की, मी जगलो नाही तरी चालेल." - साहू**

20 मे 2025 च्या दुपारी सव्वा दोनच्या सुमारास कल्याण पूर्वेतील चिकणीपाडा महाराष्ट्र नगर इथे ही हृदयद्रावक दुर्घटना घडली. सुमारे 40 वर्ष जुन्या सप्तशृंगी इमारतीचा भाग एका क्षणात कोसळला.

स्लॅब कोसळून इमारतीचा एक भाग पूर्णपणे नष्ट झाला आणि त्याखाली सहा जण अडकले. इतर सहा जणांना या मलब्यातून सुखरूप बाहेर काढण्यात यंत्रणांना यश आले.

कल्याण इमारत स्लॅब दुर्घटना फक्त अपघात नव्हती. हे निष्काळजीपणाचं, व्यवस्थेच्या अपयशाचं आणि नागरिकांच्या सुरक्षेच्या बाबतीत झालेल्या अनास्थेचं प्रतीक आहे, असं आजूबाजूला राहणारे लोक सांगतात. या घटनेत इमारतीत राहणाऱ्या साहू, यादव, चव्हाण, खरात, गुजर आणि शेलार या कुटुंबाच्या आयुष्यातलं हसू लोपलंय. कारण आजवर समोरासमोर सहवासात असणाऱ्या सहा सदस्यांचा यात मृत्यू झाला. याच घटनेत इमारतीतील तळमजल्यात राहणारे निखिल खरात गंभीर जखमी आहेत, मात्र, ते सुदैवाने बचावले आहेत.

प्रत्यक्षदर्शी आणि जखमी खरात यांचे मावसबंधू राहुल कारंडे या घटनेबद्दल बोलताना सांगितलं की, "ही घटना घडली तेव्हा आम्ही बाजूलाच एका घरात होतो. चौथ्या मजल्यावरील काम सुरू असताना फरशीचा बेस थेट सामानासहित खाली तळमजल्यापर्यंत कोसळला. यामध्ये पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावर असणाऱ्या घरातील लोक या ढिगाऱ्याखाली अडकले. हे अवघ्या काही क्षणात घडले होते." कारंडे यांनी पुढं सांगितलं की, "या दुर्घटनेत तळमजल्यावर असणारा माझा भाऊ देखील अडकला होता, मात्र सुदैवाने आम्ही तिथे पोहोचून त्याला तातडीनं बाहेर काढलं. तसंच इतर लोकांना देखील आम्ही बाहेर काढलं. इमारत जुनी आणि धोकादायक झालेली आहे. इमारतीचा अजूनही काही भाग थोडा थोडा पडतो आहे"

### धोकादायक इमारतींचा प्रश्न ऐरणीवर

**सप्तशृंगी इमारत धोकादायक इमारतींच्या यादीत नव्हती. मात्र, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यास सांगितले होते. या इमारतीच्या काही भागात डागडुजीचे काम सुरू होते. तसेच, जो भाग कोसळला त्याच भागातील चौथ्या माळ्यावर फरशी बसवण्याचं काम सुरू होत. याचदरम्यान ही दुर्घटना घडली. राज्यात अनेक शहरात धोकादायक, जर्जर आणि स्ट्रक्चरल ऑडिट न झालेल्या अनेक इमारती आहेत. काही धोकादायक इमारतींमधील रहिवासी नोटिसा बजावूनही घरे रिकामी करण्यास तयार होत नाहीत. तर काही इमारतींची प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्याने या इमारती रिकाम्या करण्याचे आव्हान स्थानिक प्राधिकरणापुढे आहे.**

# शिवकालीन शस्त्र प्रदर्शनातून छत्रपतींच्या पराक्रमाचे सजीव दर्शन !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**फोंडा, गोवा :** सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवलेनगरी, फोंडा येथे पार पडलेल्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'त शिवकालीन ऐतिहासिक आणि दुर्मिळ शस्त्रांचे भव्य प्रदर्शन धर्मप्रेमींसाठी विशेष आकर्षण ठरले. ६ हजार चौरसफुट क्षेत्रात मांडण्यात आलेल्या या आगळ्या-वेगळ्या प्रदर्शनाने छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर संभाजी महाराजांच्या पराक्रमाचे सजीव चित्र उभे केले. ३० हजारांहून अधिक धर्मप्रेमी नागरिक, तसेच संत, महंत आणि आध्यात्मिक मार्गदर्शकांच्या उपस्थितीत झालेल्या या महोत्सवात शिवकालीन शौर्य, पराक्रम आणि बलिदान यांची आठवण प्रत्येकाच्या मनात ठसठशीतपणे कोरली गेली.

प्रदर्शनात कोल्हापूरच्या सव्यासाची गुरुकुलम आणि पुण्याच्या शिवाई संस्थान यांचे शस्त्रप्रदर्शन, गोव्यातील सौंदेकर घराण्याची प्राचीन शस्त्रे, तसेच सरदार येसाजी कंक यांची तलवार आणि सरदार कान्होजी जेधे यांचे चिलखत प्रमुख आकर्षण ठरले. त्यात सर्वात हृदयस्पर्शी ठरले ते छत्रपती संभाजी महाराजांना औरंगजेबाने बंदिस्त करताना वापरलेले मूळ साखळदंड, जे शिवले कुटुंबाने पिढ्यानूपिढ्या जतन केले आहेत. या साखळदंडांचे प्रथमच सार्वजनिक दर्शन याच महोत्सवात झाले. या प्रसंगी शिवले कुटुंबातील वंशज सर्वश्री सागर शिवले, कुमार शिवले, सोमनाथ शिवले, दीपक टाकळकर आणि वेदांत शिवले यांचा हिंदु जनजागृती समितीचे पूर्वोत्तर भारताचे धर्मप्रचारक सद्गुरु नीलेश सिंगबाळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या वेळी श्री. कुमार शिवले म्हणाले, "राजांच्या बलिदानातून प्रेरणा घेऊन समाजात धर्मप्रेम जागवण्यासाठी हे प्रदर्शन आयोजित केले गेले आहे."

प्रदर्शनात शिवकालीन युद्धकलेत वापरण्यात येणारी दुर्मिळ शस्त्रे : विविध प्रकारच्या तलवारी, बंदुका, ढाली, जांबिया, तोफा, कट्यारी, चिलखत, शिरस्त्राण, भाले, कुऱ्हाडी, त्रिशूल, अंकुश, सिकल, पुरबा इत्यादींचे प्रदर्शन करण्यात आले. याशिवाय छत्रपतींच्या सैन्यातील सरदारांची सचित्र पराक्रमाची माहितीही उपस्थितांना इतिहासाचे प्रत्यक्ष दर्शन घडवणारी ठरली.



# देश विदेशातील रूग्णांच्या पोटाच्या आजारावर हमखास उपाय

## वैद्य. सदेश गावंड यांचे विश्ववेद आयुर्वेदिक क्लिनिक

पोटावरील आजारांविषयी आणि पोटाचे आजार का होतात याविषयी सखोल माहिती तसेच पोटाच्या आरोग्याविषयी काही महत्त्वाच्या स्टेप्स आणि योग्य उपाययोजना का व कशा कराव्यात यांच्यासह विविध आजारांवर मात कशी करता येईल यांची सखोल माहिती विश्ववेद आयुर्वेदिक क्लिनिकचे वैद्य.संदेश गावंड यांनी दिली || रोगा सर्वापी मंदाग्नौ|| पोटातील मंद झालेला अग्नी हेच मुळात सर्व रोगांचे मूळ कारण आहे. त्याचप्रमाणे अवेळी जेवण,जागरण, विरुद्ध आहार - उदाहरणार्थ मांसाहारी जेवण झाल्यानंतर आईस्क्रीम खाणे. हे शास्त्र विरोधी वर्तन घडत आहे. चिंता, वेळेवर झोप न घेणे, स्क्रीन टाईम वाढल्यामुळे झोपेच्या चुकीच्या वेळा यामुळे आम्लपित्त, गॅसेस, उलट्या होणे,कुंथुन संडासला होणे,वारंवार संडासला जाणे, मुळव्याध,भगंदर यासारखे पोटाचे विकार होतात. शास्त्रकार पोटाचे हे विकार होऊ नयेत म्हणून "लंघन परम औषधं" हा उपाय सांगतात.लंघन म्हणजे उपास!आठवड्यातून एक तरी उपास करावा म्हणजे अनेक व्याधीतून आपण मुक्त होऊ शकतो. असे शास्त्रकारांनी सांगितले आहे.अशी माहिती डॉ गावंड यांनी दिली तसेच ते म्हणाले की आठवड्यातून एक उपास करावा. आहारात संतुलित आहार, शाकाहाराचे प्रमाण वाढवावे. उपाशीपोटी प्रवास करू नये. योग्य वेळेवर झोपणे, ब्रह्म मुहूर्तावर उठण्याची सवय लावावी.आयुर्वेदातील त्रिस्तंभ म्हणजे आहार-निद्रा-ब्रह्मचर्य याचे पालन करावे.या त्रिस्तंभाचे पालन करणारी जीवनशैली ही निरोगी आणि आनंदी आयुष्याचे गमक आहे.आयुर्वेद हे वेदांचे उपांग आहे. भारतीय चिकित्सा पद्धतीचे मुख्य अंग हे आयुर्वेद आहे. पुण्यामध्ये आयुर्वेदिक शास्त्र शिकत असताना 'आयुर्वेदिक उपचाराचे कोणतेही दुष्परिणाम शरीरावर होत नाही' हे लक्षात आले. तसे प्राचीन भारतीय चिकित्सापद्धती म्हणून आयुर्वेदाकडे ओढा वाढत होता. आणि म्हणूनच पर्यायाने मी आयुर्वेदिक चिकित्सा करण्याचे ठरवले. 'जनसेवा ही ईश्वर सेवा आहे' या उदात्त हेतूने चिकित्सा शास्त्र हे सेवाभावी वृत्तीतूनच केले जाते. आयुर्वेदाकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहता आजारापासून पूर्णपणे मुक्तता देणारे शास्त्र असल्याने कमीत कमीत कमी फी आकारून रुग्णसेवा कशी करता येईल हा उद्देश मनात ठेवून आयुर्वेदिक व्यवसाय सुरू केला.पनवेलमध्ये 2002 रोजी विश्ववेद आयुर्वेदिक क्लिनिक स्थापन करण्यात आले तेव्हापासून ते आजतागायत जवळजवळ 24 वर्षाच्या दीर्घ परंपरेतून रुग्णसेवा सुरू आहे. आयुर्वेद शास्त्रातून चिकित्सा केल्याने आत्मिक समाधान मिळते. पंचकर्म,शमनचिकित्सा शोधनचिकित्सा,वातविकार चिकित्सा तसेच सर्व आजारांसाठी आवश्यक सर्व सोयी सुविधा आपल्या विश्ववेद आयुर्वेदिक क्लिनिक मध्ये उपलब्ध आहेत.2002 रोजी विश्ववेद आयुर्वेदिक क्लिनिक पनवेल मध्ये विश्वासाने उभे केले आणि आज 24 वर्षांमध्ये केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर विदेशातील रुग्ण देखील आयुर्वेदिक चिकित्सा घेण्यासाठी आपल्या क्लिनिकमध्ये येत असतात. खूप जुन्या आजारांनी त्रस्त असलेले हतबल झालेले रुग्ण जेव्हा उपचारासाठी आयुर्वेदाचा आधार घेतात, तेव्हा त्यांना एक आशेचा किरण आमच्यामध्ये दिसतो. डॉक्टरांसोबत दवाखान्यात प्राथमिक तपासणी रूममध्ये रुग्णांचा आत्मविश्वास वाढतो. डॉक्टरांचे शांत बोलणे, रुग्णांचे दर्शन स्पर्श आणि प्रश्न या निदान पद्धतीमुळे रुग्णांचे योग्य निदान केले जाते. व त्यातूनच त्यांच्या आजारातून बरे होण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होते. योग्य पथ्य,आहार विहार,योग्य पद्धतीने आणि योग्य वेळी औषधोपचार रुग्णांना रोगमुक्त होण्यास फायदेशीर ठरतात. जेव्हापासून विश्ववेद आयुर्वेदिक क्लिनिक सुरू केलं आहे तेव्हापासून धन्वंतरीच्या आशीर्वादामुळे आजपर्यंत तरी कटू असा प्रसंग चिकित्सा करताना आला नाही. परंतु चांगले प्रसंग मात्र खूप आले. चांगले प्रसंग वर्णन करत असताना मला आठवतात मातृत्वसूख लाभलेल्या आईवडिलांचा आनंद. कितीतरी मातांना लग्नानंतर दहा-पंधरा वर्षानंतर जेव्हा मातृत्व सुख अनुभवायला मिळाले त्यावेळेस त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि कृतज्ञता पाहिल्यावर कर्तव्य पूर्तता झाल्याची अनुभूती येते.त्यावेळेस जो आनंद मिळतो,तो केवळ अद्भुत!! जीवनातील खरा आनंद म्हणून मी यासारख्या प्रसंगांचे वर्णन करेन. या व्यवसायात नव्याने येणाऱ्या प्रत्येक युवकाचे निश्चितच स्वागत आणि अभिनंदन!!!

सर्वप्रथम मी आयुर्वेद शास्त्रामध्ये सेवा करणाऱ्या आणि नव्याने येऊ इच्छिणाऱ्या डॉक्टरांचा अभिनंदन करू इच्छितो,कारण आयुर्वेदिक शास्त्र हे कोणत्याही शतकात भूत, वर्तमान आणि भविष्यामध्ये सुद्धा उज्वलच आहे. येणाऱ्या नवीन वैद्यांना सुवर्णक्षण देणारे हे आपले भारतीय आयुर्वेदिक वैदिक शास्त्र आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आयुर्वेदिक शास्त्रामध्ये आपले करिअर करावे आणि आयुर्वेदाचा प्रसार आणि प्रचार करावा असे मी आवाहन करेन. आजच्या स्पर्धेच्या युगाबद्दल बोलताना सांगेन सोशल मीडिया. सोशल मीडियाचे अति प्रमाणात होत असलेला वापर आणि गैरवापर यांचा ढासळलेला समतोल..आजच्या मुलांना चुकीच्या वाटा, चुकीचा मार्ग दाखविण्यास प्रवृत्त करत आहे.त्यानंतर विभक्त कुटुंब पद्धती, शिक्षण,व्यवसाय, जागेची उपलब्धता यामुळे विभक्त कुटुंब पद्धती ही अस्तित्वात आली. त्यामुळे कुटुंब व्यवस्थेतील कणा म्हणजे आजी-आजोबांचे प्रेम,संस्कार मुलांना कमी मिळत आहे. त्याचबरोबर चुकीचे हॉलीवुड, बॉलीवूड ॲक्टर्स जे किशोरवयीन मुले आदर्श मानतात, तेच गुटखा, सिगारेट याची जाहिरात करताना दिसत आहेत. व्यसन करणे म्हणजे स्टेटस सिम्बॉल.. अशी मानसिकता एका बाजूने तयार होताना दिसत आहे. लवकर श्रीमंत होण्याची मानसिकता ,पैशाचे व्यवस्थापन नसणे, दिखाव्याचे जीवन,कमी होत चाललेला संवाद, ऱ्हास होत चाललेली वाचन संस्कृती अशा कितीतरी कारणांमुळे किशोरवयीन मुले जिद्द आणि संघर्ष या काटेरी रस्त्याने यशाकडे जात नाहीत. परिणामी अपयश न पचवण्याच्या वृत्तीमुळे व्यसनाधीनता वाढत चाललेली आहे. तमाम जनतेला मी नम्रपणे आवाहन करतो की पोटाच्या आजारावर रामबाण इलाज करण्यासाठी आपण निश्चितच आमच्या दवाखान्यात भेट देऊन आपला आजार बरा करता यावा यासाठी आमच्या क्लिनिकला नक्की भेट द्यावी.

**विश्ववेद आयुर्वेदिक क्लिनिक**

**लक्ष्मी अपार्टमेंट रूम नं 107,108**
**शिवाजी रोड, लाईन आळी पनवेल.**
**वैद्य. सदेश गावंड.M. D. (Ayu.)**
**9820576018**
**वैद्य. नंदिनी गावंड.M.S. (Ayu.)**
**9967151555**

# महापालिका निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी पप्पू कलानी यांच्याकडून बैठकसत्रांचे आयोजन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** महापालिका निवडणूकीचे वारे वाहताच माजी आमदार पप्पू कलानी सक्रिय झाले. त्यांनी समर्थकांचे बैठकसत्र सुरू केल्या असून बैठकीला ओमी कलानी यांच्यासह कलानी समर्थक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या बैठकसत्राने मात्र विरोधी पक्ष नेत्याच्या पोटात आल्याचे बोलले जाते. उल्हासनगरचेराजकारणात पप्पू कलानी यांच्याशिवाय पुढे जाऊ शकत नाही. असी परिस्थिती आजही कायम असून सर्वच पक्षाच्या मुख्य नेत्यांनी लोकसभा, विधानसभा व महापालिका निवडणुकी साठी कलानी महलच्या पायऱ्या झिजाविल्या आहेत. भाजपसह शिंदेसेना, ठाकरेसेना, काँग्रेस, पवारगट आदी नेत्यांना महापालिकेवर सत्ता आणण्यासाठी कलानी कुटुंब हवे आहे. गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत ओमी कलानी यांचा कुमार आयलानी यांनी पराभव केला. या पराभवाचे उट्टे काढण्यासाठी पप्पू कलानी यांनी महापालिका सत्ता हाती ठेवण्यासाठी त्यांच्या जुन्या व तरुण समर्थकांची जुळवाजुळव सुरु केली. पप्पू कलानी यांना ओमी कलानी, पंचम कलानी, नेरेंद्र कुमारी, मनोज लासी, संजय सिंग, कमलेश निकम, सुरेश गायकवाड, सुमित चक्रवर्ती, शिवाजी रगडे आदी जणांची साथ मिळाली आहे.

महापालिका निवडणूकीच्या पाश्वभूमीवर पप्पू कलानी यांनी जुने सहकारी तसेच तरुण कार्यकर्ते यांच्या सोबत बैठकसत्र सुरु केले. अश्याच बैठका प्रत्येक कॅम्प परिसरात घेण्याचे संकेत कलानी यांनी दिली. पप्पू कलानी जेल मध्ये असताना ओमी कलानी यांनी टीओके या राजकीय संघटनेची स्थापना करून भाजपा सोबत युती केली होती.

ओमी कलानी यांच्यामुळे भाजपाला मीना आयलानी यांच्या रूपाने पहिला महापौर मिळाला होता. कलानी यांनी घेतलेल्या बैठका ह्या टीओके की शरद पवार गटाच्या अंतर्गत होत्या. असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

शरद पवारांचे सैनिक - कमलेश निकम पप्पू कलानी यांनी घेतलेल्या बैठका टीओकेच्या की शरद पवार गटाच्या अंतर्गत झाल्या?. असा प्रश्न कलानी यांचे कट्टर समर्थक कमलेश निकम यांना विचारला. तेव्हा त्यांनी आम्ही शरद पवार गटाचे सैनिक असल्याचे उत्तर दिले.

# कोरोनानाशी दोन हात करण्यास ठाणे पालिका सज्ज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** हाँगकाँग आणि सिंगापूर या देशांत कोरोनाचे रुग्ण पुन्हा वाढत आहेत. तसेच मुंबईतही दोघांचा कोरोनामुळे मृत्यू झाल्याचा संशय असल्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे पालिकेचा आरोग्य विभाग सतर्क झाला. ठाणे पालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात विलगीकरण कक्ष सज्ज ठेवला आहे. त्याबरोबर पुरेसा औषधसाठा, डॉक्टरांसह इतर पथकेही सज्ज आहेत. कोरोनाच्या रुग्णामध्ये ताप आणि खोकल्याची लक्षणे आढळतात. तसे रुग्ण आढळल्यास त्यांच्यावर विशेष लक्ष ठेवून तपासणी करण्याच्या सूचना केंद्राच्या आरोग्य विभागातर्फे सर्व पालिकांना यापूर्वीच दिल्या आहेत. कळवा येथील ठामपाच्या रुग्णालयात कोरोनाचा धोका लक्षात घेता विशेष कक्ष तयार केला आहे. यामुळे यंत्रणा अलर्ट झाल्या आहेत.

अतिदक्षता विभागासह १९ बेडची उपलब्धता कळव्यातील रुग्णालयात १९ बेड सज्ज ठेवले. त्यातील १५ साधे, तर चार अतिदक्षता विभागाचे बेड आहेत. डॉक्टर आणि परिचारिका यांची पथके तयार ठेवली आहेत. याठिकाणी रुग्णांवर उपचार केले जाणार असल्याचे महापालिकेने म्हटले आहे. नागरिकांनी काळजी घ्यावी. खोकला, ताप आदी लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांकडे जाऊन तपासणी करावी. याआधी मार्च २०२० मध्ये कोरोना रुग्णांच्या संख्येने मोठी घबराट पसरली होती. ठाणे महापालिका क्षेत्रात दोन लाख ३०५ कोरोना बाधित रुग्ण आढळले होते. त्यात एक लाख ९८ हजार ४५ जणांनी कोरोनावर मात केली होती.



**सोमवार**
**२६ मे २०२५**

**मेष**
भविष्यात तुम्हाला भरपूर लाभ मिळतील. दिवस तुमच्यासाठी चैतन्यपूर्ण व चांगला जाणार आहे.

**वृषभ**
एखाद्या गोष्टीबद्दल थोडे गोंधळलेले असाल, मित्रासोबत दिवस शेअर केल्यास तुम्हाला आराम मिळेल.

**मिथुन**
आज तुम्ही नवीन वाहन खरेदी करण्याचा निर्णय घेऊ शकता. दिवस खूपच चांगला जाणार आहे.

**कर्क**
आज ऑफिसमध्ये कामाचा ताण वाढू शकतो. तुमच्या जवळच्या व्यक्तीकडून काही बक्षिस मिळेल.

**सिंह**
या राशीच्या लोकांना त्यांच्या मेहनतीचे सकारात्मक परिणाम मिळतील. सबुरीचं फळ मिळेल.

**कन्या**
आज आत्मविश्वास वाढेल. कोणतीही योजना सुरू करण्यासाठी दिवस तुमच्यासाठी चांगला आहे.

**तूळ**
वेळ वाया न घालवता आणि रखडलेली कामे पुन्हा सुरू केल्यास त्याचा फायदा होऊ शकतो.

**वृश्चिक**
जोडीदारासोबत कुठेतरी फिरण्याची योजना बनू शकते. दिवस तुमच्यासाठी खास असणार आहे.

**धनु**
कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. दिवस उत्तम राहील. व्यवहारात थोडे सावध राहावे.

**मकर**
आर्थिक लाभाचे नवीन स्रोत दिसू शकतात. कौटुंबिक कामासाठी तुम्हाला प्रवास करावा लागू शकतो.

**कुम्भ**
तुम्ही अशा व्यक्तीला भेटू शकता जो तुम्हाला भविष्यात खूप फायदे देऊ शकेल. खर्चावर नियंत्रण ठेवा.

**मीन**
आज तुमचा दिवस आनंदाचे क्षण घेऊन आला आहे. आवश्यक नसलेल्या कामांमध्ये रमू नका.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY

Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

# अंबरनाथ शहरातील धोकादायक इमारतींची यादी जाहीर

शासकीय वास्तू, महाराष्ट्र गृहनिर्माण संस्थेच्या इमारतींसह शाळांचा धोकादायक इमारतींच्या यादीत समावेश

## २२९ धोकादायक तर २० इमारती अतिधोकादायक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः** अंबरनाथ नगरपालिकेने शहरातील अतिधोकादायक इमारतींसह धोकादायक इमारतींची यादी जाहीर केली आहे. शहरात एकूण २२९ धोकादायक इमारती असून त्यातील २० इमारती अतिधोकादायक वर्गातील आहेत. तर शहराच्या पूर्व भागात सर्वाधिक १३९ धोकादायक इमारती आहेत. यात सर्वात जुन्या सुर्योदय सोसायटीतील सर्वाधिक मालमत्तांचा समावेश या धोकादायक मालमत्तांच्या यादीत आहे. नागरिकांनी अतिधोकादायक इमारतील रिकाम्या करण्याचे आवाहन नागरिकांनी केले आहे.

अंबरनाथ नगरपालिकेच्या वतीने धोकादायक इमारतींची यादी नुकतीच जाहीर करण्यात आली. या यादीत शहराच्या पूर्व भागात १३९ धोकादायक इमारती असून त्यात १० अतिधोकादायक इमारतींचा समावेश आहेत. पश्चिम भागात एकूण ९० इमारती धोकादायक असून त्यात १० इमारती अतिधोकादायक यादीत आहेत. विशेष म्हणजे या यादीमध्ये अनेक शासकीय वास्तूंचा, गृहनिर्माण मंडळाच्या इमारतींचा आणि शासकीय रूग्णालयाच्या डॉक्टरांच्या रहिवाशी इमारतीचाही समावेश आहे.

दरवर्षी अंबरनाथ नगरपालिका खबरदारीचा उपाय म्हणून शहरातील धोकादायक इमारतींची यादी जाहीर करत असते. त्यातील अतिधोकादायक इमारती तातडीने रिकाम्या करण्याचे आवाहन अंबरनाथ नगरपालिकेच्या वतीने करण्यात येते. यंदाही पालिका प्रशासनाने ही यादी जाहीर केली आहे. या यादीमध्ये असलेल्या २२९ इमारतींपैकी तब्बल १३९ इमारती अंबरनाथ पूर्व भागातील आहेत. आशिया खंडातील सर्वात मोठी सोसायटी म्हणून ओळख असलेल्या सुर्योदय सोसायटीतील अनेक वास्तूंचा यात समावेश आहे. ५० पेक्षा अधिक इमारतींचा यात समावेश आहे. सुर्योदय सोसायटीतील अनेक भूखंडांचे वर्ग दोनचे वर्ग एक करण्याची प्रक्रिया रखडली आहे. त्याचवेळी सध्याच्या घडीला पुनर्विकासाचे वारे याच सुर्योदय सोसायटीत वाहत असून अनेक जुन्या इमारतींचा पुनर्विकास केला जातो आहे. त्यामुळे येत्या काळात येथील धोकादायक इमारतींची संख्या कमी होण्याची आशा आहे.



ज्या इमारती राहण्यायोग्य नाहीत. ज्या अतिधोकादायक यादीत आहेत. त्या इमारती रिकाम्या केल्या जात आहेत. मागील काही दिवसात पाच इमारती रिकाम्या केल्या असून, उर्वरित इमारती देखील रिकाम्या करण्यात येतील.
■ उमाकांत गायकवाड, मुख्याधिकारी

अंबरनाथच्या डॉ. बी. जे. छाया शासकीय रुग्णालयाच्या डॉक्टरांच्या रहिवासी वास्तूचा धोकादायक इमारतींच्या यादीत समावेश आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण संस्था अर्थात हाऊसिंग बोर्डाच्या इमारत क्रमांक १४ आणि १५चाही यात समावेश आहे. क्राँग्रेस आणि आंबेडकरी चळवळीच्या नेत्यांच्याही नावांचा यात समावेश आहे. अंबरनाथ मशिद ट्रस्टच्या मुस्लिम जात ए उर्दू शाळेचाही अतिधोकादायक इमारतीच्या यादीत समावेश आहे. नुतन बालविकास प्राथमिक शाळा यांनाही धोकादायक इमारतीबद्दल नोटीस बजावण्यात आली आहे. तर मेटल नगर, वडवली, कानसई, बी केबीन, खेर आणि साई सेक्शनमधील अनेक इमारतींचा या यादीत समावेश आहे.

# दोनच दिवसांत ३३५ टन कचऱ्याचे संकलन

## केडीएमसीच्या ‘ड’ प्रभागात स्वच्छतेचे यशस्वी पाऊल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील "ड" प्रभागात गेल्या २ दिवसात राबविण्यात आलेली विशेष स्वच्छता मोहीम यशस्वी ठरली आहे. कल्याण पूर्व येथील आत्माराम नगर परिसर, कमलादेवी महाविद्यालय मागील भाग, साईबाबा मंदिर गुजराती चाळ, स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उद्यानासमोरील परिसर आणि मंगेशी संस्कार परिसर येथे गेल्या दोन दिवसांत रात्रीच्या सत्रात एकूण ३३५ टन कचरा उचलण्यात आला.


महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली "ड" प्रभागाचे सहाय्यक आयुक्त उमेश यमगर यांनी ही संपूर्ण मोहीम सुमित एल्कोप्लास्ट या घनकचरा व्यवस्थापन एजन्सीमार्फत राबविली. रात्रपाळीतील कामकाज अधिक प्रभावीपणे पार पाडण्यासाठी योग्य नियोजन, यंत्रणा आणि मनुष्यबळ यांचा समन्वय साधण्यात आला होता.

या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रभाग क्षेत्र "ड" चे सहायक आयुक्त उमेश यमगर, सुमित एल्कोप्लास्टचे सानु वर्गीस, प्रविण भोईर, युनिट ऑफिसर विकास सोनवणे व सुपरवायझर यांनी विशेष मेहनत घेतली आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नांमुळे ही मोहीम वेळेत आणि गुणवत्तेने पार पडली.

या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरुकता वाढली असून, स्थानिक रहिवाशांनी या मोहिमेचे स्वागत केले आहे आणि नागरिकांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे आणि कर्मचारी वर्गाच्या मदतीने परिसर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी झाला आहे अशी माहिती "ड" प्रभागाचे सहा. आयुक्त उमेश यमगर यांनी दिली आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका ही स्वच्छ भारत अभियानाच्या ध्येयपूर्तीसाठी सातत्याने कार्यरत आहे.

केवळ साफसफाई न करता, नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करून शहर स्वच्छतेचा आदर्श उभा करण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे. नागरिकांनी आपल्या परिसरात स्वच्छता राखावी, कचरा वेळेवर व योग्य पद्धतीने द्यावा आणि अशा उपक्रमांना सहकार्य करून स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यपूर्ण कल्याण-डोंबिवलीच्या निर्मितीत हातभार लावावा, असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.





# पालघर वसई किनारपट्टीला वादळीवाऱ्याचा फटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसईः** मागील काही दिवसांपासून वादळी वाऱ्यासह पावसाचा जोर कायम आहे. याचा मोठा फटका किनार पट्टीच्या भागाला बसत आहे. शुक्रवारी सायंकाळी सुटलेल्या वादळी वाऱ्यात अर्नाळा किल्ला येथील घरांच्या वरील पत्रे उडून गेल्याने सात ते आठ घरांचे मोठे नुकसान झाले आहे. अवघ्या ५ ते १० मिनिटे झालेल्या वादळाने होत्याचे नव्हते केले अशी प्रतिक्रिया येथील नुकसानग्रस्तांनी दिली आहे.

विरार पश्चिमेच्या भागात अर्नाळा किल्ला आहे. हे गाव एका बेटावर असल्याने येथील नागरीकांना बोटीतून ये जा करावी लागत आहेत. या भागातही मोठ्या संख्येने मच्छिमार बांधव राहतात. गाव बेटावर असल्याने दररोजच येथील नागरिकांना जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो. विशेषतः पावसाळ्यात या भागात विविध प्रकारच्या अडचणी निर्माण होत आहेत. मागील काही दिवसांपासून वसई विरार मध्ये वादळी वाऱ्यासह पावसाचे सत्र सुरूच आहे. नुकताच प्रादेशिक हवामान विभाग, मुबंई द्वारे पुढील काही दिवसात विजांच्या कडकडाटासह जोराचे वादळी वारे व पावसाचा इशारा देण्यात आला होता.

शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास किनार पट्टीवर जोराचे वादळी वारे आले. या वादळी वाऱ्यात अर्नाळा किल्ल्याच्या अगदी किनाऱ्या जवळ राहणाऱ्या घरांना याचा मोठा फटका बसला. अनेक घरावरील पत्रे उडून दुसऱ्यांच्या घरावर गेले त्यामुळे सात ते आठ घरांचे नुकसान झाले असल्याचे येथील नागरिकांनी सांगितले. याशिवाय मंदिराजवळील ध्वज खांब ही वाकला आहे. समुद्र खवळलेला असल्याने लाटांचे तडाखे ही जोराने बसत होते. या झालेल्या नुकसान ग्रस्त नागरिकांचे शासनाने त्वरित पंचनामे करून त्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते निनाद पाटील यांनी केली आहे.

# नशामुक्त नवी मुंबईसाठी ऑपरेशन प्रहार

## एकाच वेळी एकाच वेळी ४८ संशियतांच्या घरी धाडी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबईः** नशा मुक्त अभियानांतर्गत नवी मुंबई पोलिसांनी धडाडीची अजून एक कारवाई केली आहे. या कारवाईत गांजा विकणाऱ्या ४८ जणांच्या घरी छापे टाकण्यात आले. यात ४० लाख रुपयांचा २० किलो गांजा जप्त करण्यात आला असून सात जणांना अटक करण्यात आली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नशा मुक्त अभियान अत्यंत गांभीर्यान राबवले आहे. एप्रिल मध्ये आंतरराष्ट्रीय हायड्रो गांजा तस्करीची टोळी उघडकिस आणण्यात यश आले होते. त्यांच्या कडून २ कोटी ७२ लाख रुएए किंमतीचा हायड्रो गांजा जप्त केला होता. त्यामध्ये गांजा विक्रेते, कस्टम अधिकारी, भारतीय पोस्ट अधिकारी, मध्यस्थी हवाला मार्फत पैसे व्यवहार करणारे अंगडीया व नवी मुंबई आयुक्तालयातील २ पोलीस अंमलदार यांना अटक करण्यात आली होती. यातील संशयित आरोपी हे डार्क वेबच्या माध्यमातुन हायड्रो गांजा परदेशातून मागवत होते.


नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात राहणाऱ्या अभिलेखावरील व संशयित अशा ४८ जणांची नावे शोधून काढण्यात आली. त्यांच्यावर कारवाई साठी व्हिव्ह रचना आखण्यात आली. एकाच वेळी कारवाई करण्यासाठी सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस संदीप निगडे, यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखा, परिमंडळ-१ व २ कडील ५० पोलीस अधिकारी व १०० पोलीस अंमलदारांचे वेगवेगळे ४८ पथक स्थापन करण्यात आले.

या पथकाने एकाच वेळी ४८ संशियतांच्या घरी शुक्रवारी आज सकाळी पाच वाजता एकाच वेळी धाडी टाकण्यात आल्या. या ४८ पैकी सात जणांच्या कडे ४० लाख रुपयांचा २० किलो ७०० ग्रॅम गांजा' हा अंमली पदार्थ व रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

या कारवाईमध्ये ७ आरोपींना अटक करण्यात आलेली असुन त्यांच्या विरूध्द तळोजा, कळंबोली, खारघर, रबाळे एमआयडीसी-२, वाशी-२ असे एकुण ०७ गुन्हे अमली पदार्थ विरोधी कायदयांतर्गत दाखल करण्यात आलेले आहेत. या कारवाईत अन्य काही जणांची नावे पुढे आले आहेत. त्यांचा शोध घेतला जात आहेत

# अवकाळी पावसामुळे जनजिवन विस्कळीत!

## शेतीसह उद्योगावरही परिणाम!



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड ■ दिलीप पवार

गेले पंधरा ते विस दिवसां पासून राज्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. कधी नव्हे तो मे महिन्याच्या 6 तारखे पासून पावसाने ठाण मांडले असून तो थांबण्याची चिन्हे काही दिसत नाही.या अवकाळी पावसाचा फटका शेतकरी वर्गासह सर्वच घटकाला बसला आहे. शेतकऱ्यांची खरिप हंगामासाठी पेरणीपूर्वीची कोणतीही मशागतीची कामे झाली नाहीत. भाजीपाळा व इतर फळ उत्पादक शेतकर्यांनाही या अवकाळी पावसाचा फटका मोठा बसला आहे. त्याच बरोबर विटभट्टी व्यवसाईक, लग्न मंडप डेकोरेशन व विवाह सोहळयात पावसाचे विघ्न आल्याने आर्थिक भुर्दंड बसून आयोजकांना ऐन वेळी विवाहाची जागा बदलावी लागली आहे.

कधी नव्हे असा पाऊस सध्या मुरबाड , शहापूर तालुक्यात कोसळत असून 20 तारखेला झालेल्या वादळी पावसामुळे मुरबाड तालुक्यातील ग्रामिण भागातील अनेक ठिकाणी घरांचे छप्परावरील पत्रे, कौले फुटून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्याच बरोबर काही ठिकाणी विद्युत पोल व तारा भुईसपाट झाल्या असल्याने चार ते पाच दिवस नागरिकांना अंधारात दिवस काढावे लागत आहेत.काही ठिकाणी अजूनही विज जोडणी झाली नाही. त्याच बरोबर शहरातही तासनतास विज गायब होत असल्याने विजेवर चालणारे शिवणकाम, लॉन्ड्री, इलेक्ट्रिशन व्यवसाईकांचेही ऐन लग्न सराईत नुकसान झालेले पाहायला मिळत आहे.

पावसाच्या लवकर आगमनाने शासकीय कामे उदा.रस्त्यांचे डांबरीकरण, साकाव, ब्रीज, तलावातील गाळ काढण्यासारखी कामे रखडली असल्याने नागरिकांना मात्र अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असून एकंदरीत या अवकाळी पावसामुळे नागरिकांचे जनजिवन मात्र पुर्णतः विस्कळीत झाले असल्याचे पाहायला मिळत आहे.

# पालिकेच्या आरक्षित भूखंडाचा गैरवापर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरातील महापालिकेच्या विकास आराखड्यानुसार नागरी सुविधांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या भूखंडांवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाल्याचे समोर आले आहे. यात खासगी व्यावसायिक मोठा आर्थिक लाभ उचलत असून जागा ताब्यात घेण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने आरक्षित भूखंडाचा गैरवापर अजूनही सुरूच राहिला आहे.

मिरा भाईंदर महापालिकेने गेल्या वीस वर्षांमध्ये सुमारे १५० पेक्षा अधिक आरक्षित भूखंडविकसित करून त्यावर उद्याने, बाजारपेठा, मैदाने, सभागृहे, नाट्यगृहे आदी नागरी सुविधा उभारल्या आहेत. मात्र, वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत या सुविधा अपुऱ्या ठरत असून, इतर आरक्षित भूखंडांचा विकास करण्याची गरज निर्माण झाली आहे.

मात्र आरक्षित जमिनी ताब्यात न आल्यामुळे हे काम रखडले आहे. विकास आराखड्यात ज्या कामासाठी भूखंड आरक्षित आहे, त्याच कामासाठी त्याचा वापर करणे बंधनकारक असतानाही, अनेक ठिकाणी भूखंडांचा व्यावसायिक वापर सुरू आहे. काही भूखंडांवर लग्न समारंभ, खासगी कार्यक्रम, मार्बल दुकाने, क्रिकेट टर्फ्स, तात्पुरती दुकाने अशा स्वरूपात उपयोग होत असून, मालक त्यावर लाखो रुपये कमवत आहेत. विशेष म्हणजे काही भूखंड महापालिकेच्या ताब्यात असूनही तिथेही खाजगी दुकाने थाटल्याचे दिसून येत आहेत.

दोन वर्षांपूर्वी शहरातील जवळपास २८ आरक्षित भूखंडावर अतिक्रमण झाल्याचा अहवाल अतिक्रमण विभागामार्फत तयार करण्यात आला होता. त्यावरून काही भूखंड प्रशासनाने ताब्यात देखील घेतले. परंतु पुन्हा याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे खासगी व्यवसायिकांची संख्या वाढत असल्याचे दिसून येत आहे. जर असाच प्रकार सुरू राहिला तर आरक्षित भूखंड अतिक्रमणाच्या विळख्यात सापडण्याची शक्यता आहे.

महापालिकेने तीन वर्षांपूर्वी आरक्षित भूखंड संरक्षित ठेवण्यासाठी सुरक्षा कुंपण उभारण्याचा निर्णय घेतला होता. यासाठी २ कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजुरी करण्यात आला होता. मात्र, आजतागायत या ठरावाची अंमलबजावणी न झाल्यामुळे अतिक्रमण वाढले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे कल्याण पूर्वेत महारोजगार मेळावा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण ● शरद शहाणे

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कल्याण डोंबिवली जिल्हा आणि लक्ष फाउंडेशन महाराष्ट्र राज्य इक्विटास डेव्हलपमेंट इनिशिवेटीव्ह ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण मध्ये प्रथमच भव्य रोजगार मेळाव्याची आयोजन करण्यात आले होते

या रोजगार मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे 40 पेक्षा अधिक नामांकित कंपन्यांचा सहभाग, तीन हजार हून अधिक नोकरीची सुवर्णसंधी कागदपत्रांचे पूर्तता आणि इंटरव्यू नंतर ताबडतोब ऑफर लेटर देण्यात येते पाचवी ते दहावी दहावी ते बारावी पुढे आर्ट सायन्स कॉमर्स, एमबीए एमसीए एम एस डब्ल्यू एम सी ए एस , डिप्लोमा डिग्री अशा अनेक शैक्षणिक पात्रतेच्या गरजूंना सुवर्णसंधी आहे.

या भव्य महारोजगार मेळाव्याचे आयोजक जगन्नाथ (अप्पा )शिंदे कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी. विक्रांत जगन्नाथ पाटील(विधानसभा अध्यक्ष 142 कल्याण पूर्व) राष्ट्रवादी पार्टी. या महारोजगार मेळाव्याला भरभरून प्रतिसाद मिळाला

या कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे कल्याण डोंबिवली आणि ग्रामीण परिसरातील सर्व तरुण-तरुणींना जास्तीत जास्त रोजगार कमीत कमी वेळात आणि सहज उपलब्ध व्हावा हाच हेतू आहे या कार्यक्रमासाठी अनिल करपे, मनोज नायर अशा अनेक कार्यकर्त्यांचे परिश्रम लाभले आहेत




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com



दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता



ठाणे ■ सोमवार ४
■ २६ मे २०२५
jeevandeeppvartanews2020@gmail.com

## ठाण्यात एकवीस वर्षीय तरुणाचा करोनामुळे मृत्यु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रात करोना विषाणूने पुन्हा डोके वर काढले असतानाच, शनिवारी सकाळी एका २१ वर्षीय तरुणाचा करोनामुळे मृत्यु झाल्याची बाब उघडकीस आली. या तरुणाला मधुमेह आजाराच्या त्रासामुळे कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या तीन दिवसात करोनाचे १० रुग्ण आढळले आहेत. या रुग्णांमध्ये करोनाची सौम्य लक्षणे असून त्यांच्यावर घरीच उपचार सुरू आहेत. ठाणे महापालिका क्षेत्रात करोना विषाणूने पुन्हा डोके वर काढल्याचे चित्र आहे. करोना रुग्ण आढळण्यास सुरूवात झाल्याच्या पार्श्वभूमीवर, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी शुक्रवारी विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीत महापालिका क्षेत्रातील करोना रुग्ण स्थितीची माहिती घेतली. करोना रुग्णांच्या तपासणीसाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाने तसेच सर्व रुग्णालयांनी सतर्क रहावे, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले होते. तसेच, कळवा येथे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात विशेष कक्ष तयार करण्यात आला आहे. असे असतानाच, या रुग्णालयात शनिवारी सकाळी मुंब्रा परिसरात राहणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणाचा करोनामुळे मृत्यु झाल्याची बाब उघडकीस आली. या वृत्तास ठाणे महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांनी दुजोरा देत या तरुणाला मधुमेह आजार असल्याने तो उपचारासाठी दाखल झाला होता, असे त्यांनी स्पष्ट केले.

## माळशेज घाटातील वाहतूक सुरळीत



● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

■ बाळासाहेब भालेराव

**मुरबाड दि. २५ :** मुरबाड माळशेज घाट राष्ट्रीय महामार्गावर २२मे२०२५ रोजी पहाटे ४.३० सुमारास माळशेज घाटात रस्त्यालगत दरड कोसळल्याची घटना घडली होती.येथे कोणत्या प्रकारची जीवीतहानी घटना घडली नाही.राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकाम विभागच्या पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केल्यानंतर तात्काळ दरड बाजूला करण्यात आली. त्यानंतर आता मुरबाड माळशेज घाटात सुरळीतपणे दोन्ही बाजूने वाहतूक सुरू आहे. तसेच घाटात खरा पाऊस जून महिन्यात पडत असतो परंतु येथे मात्र मे महिन्यातच पावसाळ सुरू झाला आहे त्यामुळे गुरुवारी पहाटेच्या दरम्यान दरड कोसळल्याची घटना घडली होती. परंतु घाटामध्ये राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाचे सतर्क कर्मचारी असल्याने दिसून येत आहे. कारण तेथे छोटे -मोठे दगड पडले तर त्यांना तात्काळ हलवण्यासाठी बांधकाम विभागाच्या वतीने जेसीबी/ ट्रॅक्टर इतर साहित्य तैनात करण्यात आला आहे. परंतु माळशेज घाटात रस्त्याचे काम चालू आहे त्यामुळे जाताना/येताना वाहनचालक ,प्रवासी व मोटर सायकल स्वार यांनी आपल्या स्वतःची काळजी घेऊन घाटात प्रवास करावा असे आवाहन माळशेज घाट महामार्ग पोलीसांच्या वतीने करण्यात आले आहे..

## सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात तीस हजार हिंदूंचा सहभाग

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**पेण (प्रतिनिधी)** संत-गुरुजन नेहमी सांगायचे, 'आगामी काळ युद्धाचा आहे. त्या युद्धात विजय मिळवण्यासाठी, ते युद्ध लढण्यासाठी प्रत्येक हिंदूने तयार होण्याची आवश्यकता आहे.' पहेलगामच्या हल्ल्यात धर्म विचारून माणसे मारली गेली. पूर्वीही औरंगजेब असो, अकबर असो किंवा इतर अनेक शत्रूंनी हिंदूंचे नाव विचारून, धर्म विचारून त्यांचे धर्मांतर केले. जे धर्मांतर करत नव्हते, त्यांना मारले गेले. आज त्याचेच बिघडलेले वंशज त्यांच्याच मार्गदर्शनावर चालत आहेत. अशा प्रवृत्तीचे लोक केवळ पहेलगाममध्येच नाही, तर प्रत्येक राज्यात, प्रत्येक जिल्ह्यात लपलेले असू शकतात. त्यामुळे हिंदूंनी आपल्या मुलांना स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षण द्यायला हवे. जो लढेल तोच वाचेल. जो लढणार नाही त्यांच्यासाठी येणारा काळ खूप कठिण आहे. त्यामुळे येथून जाण्यापूर्वी समस्त हिंदूंनी एक असा संकल्प घ्या की, आगामी काळात भारताला हिंदु राष्ट्र बनवण्यासाठी आवश्यक ते प्रत्येक पाऊल उचलू आणि संघटितपणे राहू, असे आवाहन तेलंगणा येथील भाजपचे प्रखर हिंदुत्वनिष्ठ आमदार श्री. टी. राजासिंह यांनी केले. ते 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'त बोलत होते. गोव्याच्या पवित्र भूमीत 'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवलेनगरी' येथे सुरू असलेल्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चा भव्य आणि भक्तिमय समारोप झाला. भारतासह जगभरातील २३ देशांतून आलेले सुमारे ३० हजार हिंदू धर्मप्रेमी आणि साधक यांनी महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून हिंदु एकात्मतेचे दर्शन घडवले. हा महोत्सव म्हणजे हिंदु राष्ट्र स्थापनेच्या दिशेने पडलेले एक महत्त्वाचे पाऊल होते. या महोत्सवात विविध आध्यात्मिक, राष्ट्रहितकारी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महत्त्वाचे म्हणजे भारताच्या विजयासाठी, तसेच भारतीय सैन्य, सनातन धर्मप्रेमी आणि राष्ट्ररक्षण यांसाठी आयोजित शतचंडी यज्ञ, तर समस्त सनातन हिंदु धर्मियांसाठी चांगले आरोग्य लाभो यासाठी महाधन्वंतरी यज्ञ भावपूर्णरित्या पार पडला. यासाठी तामिळनाडू येथून ३५ पुरोहित आले होते. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या शुभहस्ते 'सनातन धर्मध्वजा'चे जयघोषात आरोहण करण्यात आले. या महोत्सवात देशभरात राष्ट्र अन् धर्म कार्य करणाऱ्या २५ राष्ट्र अन् धर्म निष्ठ व्यक्तींना 'हिंदु राष्ट्ररत्न' आणि 'सनातन धर्मश्री' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हे पुरस्कार आता दरवर्षी दिले जाणार आहेत.

## आंतरराष्ट्रीय स्पर्धेत डोंबिवलीच्या नक्ष घुंगरीची गरुड झेप

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

■ कुणाल म्हात्रे

**कल्याण :** डोंबिवली मधील नक्ष नरेश घुंगरी सध्या चर्चेचा विषय ठरला असून त्याने इंडिया टीम ने पुरस्कृत केलेल्या इंडोनेशिया येथील सेमारांग येथे झालेल्या चॅम्प ऑफ द चॅम्प इंटरनॅशनल स्केटिंग स्पर्धेत दोन वेगवेगळ्या रिले रेस या स्पर्धेमध्ये एक नव्हे तर तब्बल दोन कास्य पदक पटकावत भारताचा तिरंगा डौलाने फडकवला.

डोंबिवली मधील सामान्य कुटुंबातील मुलगा नक्ष हा अवघ्या वर्षे 11 वर्षाचा असून त्याने स्केटिंग या खेळात केलेली कामगिरी गौरवापद अशीच आहे. नुकत्याच इंडोनेशिया येथे झालेल्या स्पर्धेमध्ये त्याने दोन कांस्यपदके पटकावले खरे पण या स्पर्धेत जाण्यासाठी त्याला अनंत अडचणीला सामना करावा लागला. आई आणि वडील दोघेही क्रीडा क्षेत्रामध्ये असल्या मुळे लहानपणापासूनच खेळाची आवड, त्यामुळे स्केटिंग या खेळात काहीतरी करून दाखवायची ही जिद्द बाळगून सराव करत होता. आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये जाण्यासाठी फक्त इनलाइन स्केटिंग ची आवश्यकता असते. स्पर्धा ही इनलाइन स्केटिंग वरच होते.

स्केटिंग हा खेळ थोडासा महागडा असल्यामुळे या खेळाकडे सामान्य खेळाडू सहसा प्रयत्न करत नाहीत. अशा अनेक संकटावर मात करत नक्ष ने सराव चालू ठेवला. आई-वडिलांनी प्रयत्न करून त्याला इनलाइन स्केटिंग घेऊन दिले. स्पर्धेला जाण्यासाठी आर्थिक मदत उभी केली. ह्या सर्व संधीचं नक्ष ने इंडोनेशियामध्ये दोन पदक मिळवत आई-वडिलांना तसेच ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्या सर्वांना नक्कीच रिटर्न गिफ्ट दिलं असं म्हणावे लागेल. डोंबिवलीमध्ये वास्तव्यास असलेल्या सुरभि घुंगरी आणि नरेश घुंगरी यांच्या एन जी स्केटिंग अकॅडमीच्या नक्ष ह्याने ५00 मीटर अंतराच्या झालेल्या दोन रिले रेसेसच्या दोन्ही शर्यतीत दोन कांस्यपदकांवर आपले नाव कोरले, मात्र वैयक्तिक रिंक रेस प्रकारात नक्ष नरेश घुंगरी याला पाचव्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. या अटीतटीच्या झालेल्या शर्यतीत नक्ष याला शेवटच्या फेरीत आपला वेग वाढवत अंतिम रेषा पार करताना सहा सेकंद कमी पडले त्यामुळे त्याला पाचव्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. तरीही नक्ष ने हार न मानता इंडिया टीम तर्फे रिले रेस मध्ये भाग घेऊन १ कांस्यपदक पटकावले आणि मिक्स टीम रिले रेसमध्ये १ कांस्यपदक मिळवत आपले, आपल्या पालकांचे आणि आपल्या देशाचे नाव मोठे केले.

## तरुणांनो उद्योजक व्हा ; जिल्हा प्रशासन आपल्या पाठीशी -जिल्हाधिकारी किशन जावळे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी) :** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षीत युवक-युवतींना व्यवसाय उभारणीसाठी प्राधान्याने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते. शासनाने या योजनेत अमूलाग्र बदल केला असून कोकणातील स्थानिक बाबींचा यामध्ये समावेश केला आहे. तरी जास्तीत जास्त युवकांनी या योजनेचा लाभ घेऊन उद्योजक बनावे. यासाठी जिल्हा उद्योग केंद्र व बँक यांनी सर्वोतोपरी सहाय्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या लाभार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक गुरुशांत हरळय्या, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विजय कुलकर्णी, उद्योजक लक्ष्मण जाधव यांसह जिल्ह्यातील प्रमुख बँकर्स उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.जावळे यांनी जिल्ह्यात उद्योगधंदे उभारणी झाली तरच रोजगार निर्मिती होईल हे लक्षात घेऊन या कार्यक्रमांतर्गत सुशिक्षीत युवक-युवतींना कर्ज उपलब्ध करुन त्यांना व्यवसाय उभारणीसाठी प्राधान्याने कर्जाचा पुरवठा करण्याचे निर्देशित केले. तसेच सर्व बँकांच्या



जिल्हा समन्वयकाने प्राधान्याने जास्तीत जास्त कर्ज पुरवठा करण्याकडे लक्ष द्यावे. नव उद्योजकांनी उद्योग उभारल्यास त्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होऊन आर्थिक उन्नती साध्य करता येईल. या उद्योजकांमध्ये आर्थिक विकासाला चालना देण्याची क्षमता आहे असेही त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमात रायगड जिल्ह्याने 100 टक्के उद्दिष्ट पूर्ण केले ही अतिशय भूषणावह बाब आहे. यंदाच्या वर्षात जिल्हा प्रशासन 200 टक्के उद्दिष्ट पूर्ण करेल असेही त्यांनी यावेळी सांगितले. लाभार्थ्यांने आपला उद्योग व्यवसाय सुरु करताना येणाऱ्या अडचणी, समस्या जिल्हा प्रशासनास अवगत केल्यास जरुर आम्ही आपल्याला मदत करणार असे आश्वासन जिल्हाधिकारी श्री.जावळे यांनी सर्व लाभार्थ्यांना दिले. तसेच सर्व नवउद्योजकांना आपल्या भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त करुन त्यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

जिल्हा महाव्यवस्थापक श्री.हरळय्या यांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेत आता दुहेरी फायदा आणि मोठ्या संधी मिळणार असल्याचे सांगितले. उत्पादन क्षेत्रातील प्रकल्पांसाठी रु.1 कोटी आणि सेवा व कृषी पूरक व्यवसायांसाठी रु.50 लाख पर्यंत कर्ज मिळवण्याची संधी आहे. सेवा उद्योगांसाठी आता प्रकल्प खर्चाच्या 60% आणि उत्पादन उद्योगांसाठी 40% पर्यंत खेळत्या भांडवलासाठी निधी उपलब्ध होणार आहे. Tasech कुक्कुटपालन, अंडी उबवणी केंद्र, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, हॉटेल/ढाबा (शाकाहारी/मांसाहारी), होम-स्टे, क्लाऊड किचन, जलक्रीडा, मासेमारी, प्रवासी वाहतुकीकरिता बोट व्यवसाय आता योजनेतंर्गत पात्र असणार आहे. 10 लाखांवरील उत्पादन प्रकल्पांसाठी आणि 5 लाखांवरील सेवा व कृषी पूरक व्यवसायांसाठी आता फक्त 8 वी पास असणे आवश्यक असून18 वर्ष पूर्ण झालेल्या कोणत्याही स्थानिक रहिवाशाला या योजनेचा लाभ घेता येईल. सर्वांनी जिल्हा उद्योग केंद्राशी संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. जिल्हा महाव्यवस्थापक श्री.हरळय्या यांनी उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त करुन भविष्यात अडचणी आल्यास जिल्हा उद्योग केंद्र येथे भेट द्यावी, असे सांगून मेळाव्याची सांगता करण्यात आली.

## एसएसटी महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** एसएसटी महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ मोठ्या उत्साहात आणि थाटात पार पडला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील या मोलाच्या टप्प्यावर महाविद्यालयाने त्यांच्या यशाचा गौरव करत एक संस्मरणीय सोहळा साजरा केला.

महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित या सोहळ्याला आमदार सुलभा गायकवाड प्रमुख पाहुण्या म्हणून तसेच विशेष अतिथी म्हणून शाह अँड अँकर कच्छी इंजिनिअरिंग कॉलेज, मुंबईच्या रिसर्च अँड डेव्हलपमेंट च्या असोसिएट डीन डॉ. नम्रता कोमिनेमी, ग्रामीण प्रगती फाउंडेशन चे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश डफले तसेच महाविद्यालयाचे अध्यक्ष आणि संस्थापक प्राचार्य डॉ. पुरस्वानी आमंत्रित होते.

डॉ. कोमिनेमी यांनी विद्यार्थ्यांना सातत्याने कौशल्य वाढवण्याचा आणि अपयशालाही सकारात्मकतेने सामोरे जाण्याचा सल्ला दिला. प्राचार्य डॉ. पुरस्वानी यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत महाविद्यालयाशी असलेले संबंध पुढेही राहतील या भावना व्यक्त करत भविष्यातही महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या विकासासाठी राबवित असलेल्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले.

विद्यार्थ्यांनी पदवी प्रदान समारंभाच्या पोशाखात उपस्थित राहून पदव्या स्वीकारल्या. त्यांनी महाविद्यालयीन आठवणींना उजाळा देत अध्यापन, स्पर्धा आणि मार्गदर्शनातून मिळालेल्या आत्मविश्वासाबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. हा समारंभ विद्यार्थ्यांच्या यशाला दाद देणारा आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा देणारा ठरला.

## मुरबाड मध्ये अवकाळी पावसाची रिपरिप दुपारनंतर विजेच्या गडगडासह धो धो पाऊस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड मध्ये अवकाळी पावसाची सकाळी रिपरिप सुरू! असून दुपार नंतर विजेच्या गडगडासह धो धो पाऊस कोसळला!मुरबाड दि.२५-तालुक्यातील ग्रामीण भागात तसेच मुरबाड शहर परिसरात जवळपास २० दिवस अवकाली पाऊस पडत आहे त्यामध्ये कधी ढगाळ वातावरण कधी थोड्या उशिरात ऊन जाणवतं,, परंतु रविवारी सकाळपासूनच पावसाने रिपरिप सुरू केल्याचे चित्र दिसून आले. त्यानंतर दुपारी अडीच ते तीनच्या दरम्यान विजेच्या गडगडासह धो धो पाऊस कोसळला. त्यामुळे जवळपास संपूर्ण मे महिन्यात पाऊस पडत असल्याचे चित्र समोर येत आहे. मात्र जूनमध्ये पाऊस कसा असणार याची चिंता आता शेतकरी वर्गाला लागली आहे कारण सात जून मध्ये पाऊस येत असतो मात्र एक महिना अगोदरच पाऊस पडून जात आहे त्यामुळे येणारा जून महिना पावसासाठी वातावरण कसे असेल की शेतकऱ्यांना दगा देतो की काय हे पाहणे आता उचित राहणार आहे. सध्या पडणारा अवकाळी असणारा पाऊस हा जून महिन्यासारखा वाटू लागला आहे.



## कोपरी गावातील विहिरीत आढळला मृतदेह

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** पूर्व येथील कोपरी गावातील शेलार हाऊस, जवळील एका विहिरीत एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याची धक्कादायक घटना रविवारी उघडकीस आली. हेमंत जगन्नाथ शेलार (अंदाजे ६३) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते डोंबिवलीतील रहिवासी असून शनिवारी सायंकाळी ते ठाण्यातील कोपरी गावात राहणाऱ्या भावाकडे आले होते. परंतु, त्यानंतर ते रात्रीपासून बेपत्ता होते. रविवारी सकाळी ८:३० च्या सुमारास कोपरी गावातील शेलार हाऊस जवळ असलेल्या विहिरीत त्यांचा मृतदेह तरंगताना दिसून आला. या घटनेची माहिती मिळताच कोपरी पोलीस, अग्निशमन दलाचे जवान, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी तसेच ठाणे महापालिकेची शववाहीका तातडीने घटनास्थळी दाखल झाली. अग्निशमन आणि आपत्ती व्यवस्थापन कर्मचाऱ्यांच्या मदतीने मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आला. पोलिसांच्या उपस्थितीत मृतदेह ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालय येथे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. याप्रकरणी कोपरी पोलीस ठाण्यात पुढील तपास सुरु आहे.





## वन विभागाची दबंग कामगिरी
### रानडुक्कर तस्कर वनविभागाच्या जाळ्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :: राजेश जागरे**

शहापूर उपवनसंरक्षक अंतर्गत असलेल्या शहापूर वनपरीक्षेत्र हद्धीतील आसनगाव महामार्गलगत रानडुकरांची तस्करी करत असताना वनकर्मचाऱ्यांनी पाठलाग करुन वाहनचालक व आरोपीना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले.

शहापूर वनविभाग,वन परीक्षेत्र अधिकारी शहापर यांना तिनांक २५ मे रोजी पहाटे २ वाजता मिळालेल्या बातमीनुसार परिमंडळ आटगांव राऊंड यांनी महामार्ग क्रमांक ३ वरील आसनगाव जवळील वजन काट्याजवळ क्रमांक एमएच ४८ एवाय ४२६८ ही गाडी अडवून तिची तपासणी केली असता या वाहनामध्ये १८ रानडुक्कर आढळली. यावेळी वाहन चालक व एक आरोपी यांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी केली असता इगतपुरी तालुक्यातील घोटी येथील मुख्य सुत्रधार राजेद्र सखाराम पवार वय-४८ यास आरोपींच्या जबाबावरून ताब्यात घेतले. सदर करवाई उपवनसंक्षक दिपेश मल्होत्रा,सहाय्यक वनसंरक्षक (जंकास व कॅम्प्पा) यांच्या मार्गदर्शनाखली वनपरीक्षेत्र अधिकारी शैलेश गोसावी यांचे सूचनेनुसार आटगाव वनपाल संदीप केदार, वनरक्षक संतोष खंदारे व वन मजूर अनंता पडवळ यांनी केली. जंगल व्याप्त असलेल्या शहापूर तालुक्यात अनेक जंगली श्वापदे आढळतात. परंतु, अलीकडे काही भागामध्ये रानडुकरांसह छोट्या प्राण्यांच्या शिकारीचे प्रमाण वाढले आहे. यामुळे वनविभागाला डोळ्यात तेल घालून कर्तव्य बजावावे लागणार असल्याचे मत निसर्गप्रेमी व्यक्त करताना दिसत आहेत. तर वनविभागाने केलेल्या या कारवाईचे तालुक्यातुन कौतुक होतांना दिसत आहे.

## रेल्वे प्रवासात वाद! संतापलेल्या प्रवाशाने घेतला सहप्रवाशाचा चावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** उपनगरीय रेल्वेगाडीच्या दाराजवळ उभे राहून प्रवास करणाऱ्या दोन प्रवाशांमध्ये वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की, त्या व्यक्तीने प्रवाशाच्या हाताला चावा घेतला. हा सर्व प्रकार प्रथमवर्ग डब्यामध्ये घडला. याप्रकरणी ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. डोंबिवली येथे ४८ वर्षीय जखमी प्रवासी राहतात. ते मुलुंडमध्ये एका खासगी कंपनीत कामाला आहे.

शुक्रवारी सकाळी त्यांनी कामाला जाण्यासाठी ठाकुर्ली रेल्वे स्थानकातून रेल्वेगाडीने प्रथम वर्ग डब्यातून प्रवास सुरु केला. प्रवासा दरम्यान ते रेल्वेगाडीच्या दाराजवळ उभे होते. रेल्वेगाडी कळवा रेल्वे स्थानकात आली असता, एक प्रवासी त्या रेल्वेगाडीत शिरला. तो प्रवासी त्यांच्या समोरच उभा राहिल्याने त्यांनी त्याला आतमध्ये जाण्याची विनंती केली. परंतु त्या प्रवाशाने मी आत जाणार नाही असे म्हणत वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद इतका विकोपाला गेला की,

त्या व्यक्तीने डोंबिवलीच्या प्रवाशाच्या हाताला जोरदार चावा घेतला. त्यानंतर ते दोघेही मुलुंड स्थानकात उतरले. तिथेही त्यांच्यामध्ये वाद सुरु झाला. त्या प्रवाशाने त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच हातातील ब्रेसलेटने त्यांच्या डोळ्याजवळ आणि डोक्यावर मारले.

दरम्यान, घटनेची माहिती मुलुंड रेल्वे स्थानकातील पोलिसांना मिळाल्यानंतर पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी दोघांनाही ताब्यात घेतले. जखमी कर्मचाऱ्यावर रेल्वे स्थानकातील स्थानक व्यवस्थापकाच्या कक्षामध्ये प्रथमोपचार करण्यात आले. दोन्ही प्रवाशांना ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात नेण्यात आले. तिथे जखमी प्रवाशाने तक्रार दिली. या तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल झाला आहे. तसेच मारहाण करणाऱ्या प्रवाशाला पोलिसांनी नोटीस बजावली आहे.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com